महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १५ /२०२३ दि. ३० /०१/२०२३

**'वाहतूक नियंत्रण अधिसुचना'**

**ज्याअर्थी,** विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०१/०२/२०२३ ते दि. ०९/०२/२०२३ या कालावधीत **'हाजी मलंग बाबा दर्गा उरूस (संदल) २०२३'** साजरा करण्यात येणार असून सदर ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होवून वाहतूक कोंडी निर्माण होणार आहे. नमूद कालावधीत **नेवाळी नाका जड अवजड वाहनांचे वाहतुकीस बंद करण्यात येणार** असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कोळसेवाडी व कल्याण शहराकडून नेवाळी नाका (हाजी मलंग) वाडीकडे येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **नेवाळी नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नेतीवली, टाटा पॉवर व मानपाडा पोलीस स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) नवी मुंबई कडून नेवाळी नाकाकडे येणाऱ्या जड–अवजड वाहनांना **नेवाळी नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने खोणी नाका येथून डावीकडे वळण घेवून बदलापूर नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) बदलापूर, अंबरनाथ कडून नेवाळी नाका मार्गे नवी मुंबई व ठाणे शहराकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना **नेवाळी नाका येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने फॉरेस्ट नाका व साईबाबा मंदिर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. ०१/०२/२०२३ रोजी सकाळी ०५:०० वा. ते दि. ०९/०२/२०२३ रोजी रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.

२/— म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.